नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/10/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर चिचोली ता. मौदा येथे दिनांक 15/10/2020 चे 01.25 वा. दरम्यान एमच–36/एए–6661 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– रनविर नामदेवजी गाढवे, रा. गोपेवाडा सहापुर जवाहरनगर जि. भंडारा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 16,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,16,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक हेमंत जाधव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 किमी अंतरावर चिचोली ता. मौदा येथे दिनांक 15/10/2020 चे 01.50 वा. दरम्यान एमच–49/एटी–0130 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– सचिन शेंदरे, रा. टेकेपार डोडमाधरी जि. भंडारा याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 20,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 25,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक कोमल कडु यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील बस स्टॅाप काटोल येथे दिनांक 15/10/2020 चे 11:55 वा. ते 12.00 वा. दरम्यान एमएच–20/ डी–9206 क्रमांकाच्या बसचा चालक आरोपी नामे– संजय महादेव चोपडे, रा. काटोल याने त्याच्या बस मध्ये प्रवासी बसवुन कोंढाळी करीता निघाले असता बसचे उजव्या बाजुचे मागील चाकामध्ये एक इसम मधात आल्याने उजव्या बाजुचे मागील चाक त्याचे डोक्यावरून गेल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. त्यादरम्यान गर्दीतील लोकांनी मृतक हा रिधोरा येथील शेषराव जेठुजी खंडाते, वय 64 वर्ष असल्याचे सांगितले व त्याचा खिशातील आधार कार्ड वर ही हेच नाव होते आरोपी बस घेवुन निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नरेन्द्र रधुनाथ राउत, वय 50 वर्ष, रा. पंचवटी काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री बांद्रे 9823904141 हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर मौजा बिना संगम येथे दिनांक 15/10/2020 चे 19:00 वा. सुमारास फिर्यादी नामे– गं.भा शोभा केदार पिंपळकर, वय 50 वर्ष, रा. वार्ड क्र. 03 बिना संगम या घरी हजर असतांना त्यांचा मुलगा नामे– सोनु केदार पिंपळकर (मृतक), वय 22 वर्ष, रा. वार्ड क्र. 03 बिना संगम याने फिर्यादीला ''10 रू देवुन गावातील दुकानातुन खाण्याकरिता चिवडा आणुन दे'' असे म्हणाला असता फिर्यादी हि घराशेजारी चिवडा आणण्याकरिता गेली असता चिवडा घेवुन घरी परत आल्यानंतर बघते तर मृतकाने घराचे लाकडी फाटयाला काळया दुपट्याने गळफास लावलेल्या अवस्थेत दिसुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बाबापोषाक मेश्राम 9765236916 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर